Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 10 June 2024
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – १० जून २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आपलं सरकार वचनबद्ध-कार्यभार स्वीकारतांना पंतप्रधानांची ग्वाही-प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा १७वा हप्ता जारी
- राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा अभिन्न भाग-अजित पवार यांचा निर्वाळा
- नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे अनेक अभ्यासक्रम ऑनलाईन उपलब्ध

आणि

- अहमदनगर तसंच जालना जिल्ह्यात रस्ते अपघाताच्या दोन घटनांत चौघांचा मृत्यू

****

शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आपलं सरकार वचनबद्ध आहे, अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेतल्यानंतर त्यांनी आज पंतप्रधान पदाचा कार्यभार स्वीकारला, त्यावेळी ते बोलत होते. कार्यभार स्वीकारताच, सर्वप्रथम प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा १७वा हप्ता पंतप्रधानांनी जारी केला. या अंतर्गत ९ कोटी ३० लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २० हजार कोटी रुपये निधी थेट जमा होणार आहे. दरम्यान, नवनियुक्त मंत्रिमंडळाची पहिली बैठक आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे.

****

मणिपूरच्या जिरीबाम इथं आज काही हल्लेखोरांनी मुख्यमंत्री एन. बीरेन सिंह यांच्या ताफ्यातील सुरक्षारक्षकांवर हल्ला केला. सुदैवानं मुख्यमंत्री बीरेन सिंह यावेळी या ताफ्यात नव्हते. या हल्ल्यात एक सुरक्षा रक्षक जखमी झाला. घटनास्थळावर पोलिसांकडून शोध अभियान सुरू असून अतिरिक्त सुरक्षा दल तैनात करण्यात आल्याचं याबाबतच्या बातमीत म्हटलं आहे.

****

जम्मू काश्मीरमध्ये काल यात्रेकरुंच्या बसवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा दलांनी आज शोधमोहिम सुरू केली. लष्कर, पोलीस आणि केंद्रीय राखीव पोलीस दल या सुरक्षा दलांनी राजौरी जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या रयाथ, पोनी, शिव खोरी परिसराला घेराव घातला असून, ही शोधमोहीम अद्यापही सुरु असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एनडीए-राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा अभिन्न भाग असल्याचा निर्वाळा, पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २५ वा वर्धापन दिन आज साजरा होत आहे. मुंबईत षण्मुखानंद सभागृहात झालेल्या मेळाव्यात बोलतांना अजित पवार यांनी केंद्रीय मंत्रीपदावरून काहीही नाराजी नसल्याचं स्पष्ट केलं. स्वतंत्र प्रभाराच्या राज्यमंत्रिपदाचा प्रस्ताव एनडीएकडून मिळाला होता, मात्र आपण तो सध्या तो नाकारत, एनडीएसोबतच काम करत राहणार असल्याचं पवार यांनी सांगितलं. पक्षस्थापनेसह पक्षविस्तारासाठी योगदान दिलेल्या सर्वांप्रती अजित पवार यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

दरम्यान, आज सकाळी मुंबईत अजित पवार यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, मंत्री हसन मुश्रीफ, अनिल पाटील, रुपाली चाकणकर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस भवनात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत वर्धापन दिनाचा कार्यक्रम पार पडला. राष्ट्रपुरुषांच्या स्वाभिमानी विचारांवर आपण मार्गक्रमण करतांना, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी सांगितलेल्या ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या सूत्रानुसार आपण काम करत असल्याचं, पवार यांनी

सांगितलं. जनतेची सेवा, कष्टकरी, शेतकरी आणि महिला यांचा सन्मान तसंच महाराष्ट्राचा स्वाभिमान जपण्यासाठी आपण सर्वजण काम करण्यासाठी कटिबद्ध असल्याची भावना शरद पवार यांनी यावेळी व्यक्त केली.

अहमदनगर इथंही आज शरद पवार यांच्या उपस्थितीत मेळावा होत आहे.

****

कोल्हापूरचे महाविकास आघाडीचे नवनिर्वाचित खासदार शाहू महाराज छत्रपती यांनी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची मातोश्री निवासस्थानी भेट घेतली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी शाहू महाराज यांचा निवडून आल्याबद्दल सत्कार करुन शुभेच्छा दिल्या.

****

विधान परिषदेच्या नाशिक शिक्षक मतदार संघाच्या आज झालेल्या छाननीत दोन अर्ज बाद ३६ अर्ज वैध ठरले आहेत. आज झालेल्या छाननीत अमोल बाळासाहेब दराडे आणि सारांश महेंद्र भावसार यांचे वय ३० वर्षांपेक्षा कमी असल्याचं आढळल्यानं त्यांचे उमेदवारी अर्ज अवैध ठरले. किशोर भिकाजी दराडे यांच्या शपथपत्राबाबत उमेदवार रणजित बाठे यांच्या प्रतिनिधींनी आक्षेप घेतला होता. मात्र तो फेटाळण्यात आला. या निवडणुकीसाठी एकूण ३८ उमेदवारांचे ५३ अर्ज असून आज छाननी झाल्यानंतर बुधवार १२ जूनपर्यंत अर्ज मागे घेता येतील.

****

मुंबईकरांना वाहतूक कोंडीतून दिलासा देणाऱ्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज कोस्टल रोडचा नरीमन पॉइंट ते वरळीकडे जाणारा सव्वा सहा किलोमीटरचा बोगदा आज वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. या मार्गाचा उर्वरित तिसरा टप्पा जुलै मध्ये खुला करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिली. या मार्गावर प्रवास करण्यासाठी पूर्वी ४० ते ५० मिनिटांचा वेळ लागत होता मात्र या बोगद्यामुळे हा प्रवास आता केवळ ८ मिनिटात होणार आहे.

****

खरीप हंगामात खते-बियाण्यांच्या अभावी कुठंही पेरण्यांना विलंब होऊ नये, त्यासाठी शेतकऱ्यांना आवश्यक प्रमाणात बियाणे आणि खतांचा पुरवठा तसंच प्रत्येक पात्र शेतकऱ्याला पीक कर्ज मिळण्याची दक्षता घेण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री

अजित पवार यांनी सर्व विभागीय आयुक्तांना दिले आहेत. ते आज त्यांच्या मंत्रालयीन दालनात यासंदर्भातल्या आढावा बैठकीत दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बोलत होते. यावेळी पुणे विभागीय आयुक्त पुलकुंडवार यांनी आषाढी वारीच्या नियोजनाबबात माहिती दिली. आषाढी वारीसाठी मंजूर निधी ताबडतोब वितरित करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिले.

****

नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे अनेक अभ्यासक्रम आता ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती विद्यापीठाच्या कुलगुरू निवृत्त लेफ्टनंट जनरल माधुरी कानिटकर यांनी दिली आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २६ वा वर्धापन सोहळा आज विद्यापीठाच्या सभागृहात पार पडला, त्यावेळी त्या बोलत होत्या. विद्यापीठानं संशोधन प्रकल्पांना सर्वाधिक प्राधान्य दिलं असून या दृष्टीकोनातून विद्यापीठात 'दृष्टी' कक्षाची स्थापना करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. आरोग्य शास्त्राची माहिती देणारं अद्ययावत 'इक्षणा' संग्रहालय विद्यापीठ मुख्यालयात साकारण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

****

अहमदनगर जिल्ह्यातल्या जामखेड – खर्डा मार्गावर आज एका अपघातात दोघांचा मृत्यू झाला तर तीन जण गंभीर जखमी झाले. जामखेड कडून खर्डा कडे जाणारी एस टी बस आणि समोरुन येणारी कार यांच्यात हा अपघात झाला. यातील जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

जालना जिल्ह्यात दोन भरधाव दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. जालना–अंबड मार्गावरील हारतखेडा फाट्यावर आज दुपारी तीन वाजेच्या सुमारास ही दुर्घटना घडली.

****

पावसाळ्यात ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत दूषित होणार नाहीत याची योग्य ती खबरदारी घ्यावी, अशा सूचना छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक विकास मीना यांनी ग्रामपंचायतीच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं याबाबतच्या आढावा बैठकीत बोलत होते. पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताची योग्य ती दक्षता घ्यावी,

पाण्याच्या टाक्या स्वच्छ कराव्यात, सांडपाण्याचा निचरा सुयोग्य पद्धतीने करावा, आदी सूचना मीना यांनी यावेळी दिल्या.

****

लातूर शहरात पावसाळ्यात साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी लातूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जात आहेत. डेंग्यू प्रतिबंधासाठी नागरिकांनी आठवड्यातून एक दिवस `कोरडा दिवस` पाळण्याचं आवाहन महापालिकेच्या आरोग्य विभागानं केलं आहे. डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी घराच्या परिसरात पाणी साचू देऊ नये तसंच घराच्या खिडक्यांना जाळ्या बसवाव्यात असं आवाहनही महापालिकेनं केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीनं दहावी तसंच बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंतांचा आज गौरव करण्यात आला. समर्थ नगर इथल्या श्रीराम मंदिरात आज दुपारी झालेल्या या कार्यक्रमात सुमारे शंभरावर विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आलं.

****

धाराशिव इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या नेत्र विभागाच्या वतीने १० जून ते १६ जून या कालावधीत राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत दृष्टीदिन सप्ताह राबवला जात आहे. डॉ.रामचंद्र लक्ष्मण भालचंद्र यांच्या स्मृतीप्रित्यर्थ असलेल्या या सप्ताहाला आजपासून प्रारंभ झाला. यावेळी नेत्रदानाचं महत्त्व सांगून, नेत्रदानाचे संमतीपत्र भरुन देण्याबाबत आवाहन करण्यात आलं.

****

नैर्ऋत्य मोसमी पावसाची आगेकूच सुरू असून तो राज्याच्या बहुतांश भागात सक्रीय झाल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. आज राज्यात पुणे, सातारा, सोलापूर, लातूर, अहमदनगर, नाशिक, नंदुरबार, जळगाव, धुळे आणि बीड जिल्ह्यात जोरदार पावसाची शक्यता असून हवामान विभागानं या जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

****